दि. ०५.०७.२०२३

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक मुजाहेद खुर्शीद शेख, वय ५५ वर्ष, पद – पोलीस उप निरीक्षक, ने. पोलीस स्टेशन देवणी, ता. देवणी, जि. लातूर, हा.मु. आयशा कॉलनी जवळ, जळकोट रोड उदगीर, रा. भाग्यनगर, जि.प. शाळेजवळ अहमदपुर, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक मुजाहेद खुर्शीद शेख, पोलीस उप निरीक्षक यांनी तक्रारदार त्यांच्या विरूध्द प्रभाकर शिंदे यांनी पो.स्टे. देवणी येथे काळया मातीची चोरी केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करणे बाबत केलेल्या तक्रारी अर्जात तक्रारदाराला कुठलाही अडथळा न येवु देता तक्रारदारच्या बाजूने अर्ज निकाली काढल्याचा मोबदला तसेच भविष्यात देखील तक्रारदारास प्रभाकर शिंदे यांचे कडुन प्राप्त होणा–या तक्रारीत मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. ०४/०७/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. ०५/०७/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार पोउपनि मुजाहेद शेख यांनी सुरूवातीस सोन्याचं बिस्कीट आणि स्वत:साठी ३,०००/– रूपये व साहेबांसाठी ५,०००/– रूपये लाचेची मागणी करून नंतर तडजोडी अंती स्वत:साठी ३,०००/– रूपये व साहेबांसाठी ५,०००/– रूपये असे एकुण ८,०००/– रूपयाची लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. ०५/०७/२०२३ रोजी तक्रारदार हे आलोसे शेख यांना गुलजार हॉटेल समोर रोडवर उदगीर येथे जावुन भेटले असता आलोसे पोउपनि मुजाहेद शेख यांनी १५.४८ वा. सुमारास लाचेची रक्कम ८,०००/– रू स्वत: पंचासमक्ष स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहात पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आलोसे मुजाहेद खुर्शीद शेख, पोलीस उप निरीक्षक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन उदगीर शहर, ता.उदगीर, जि. लातूर येथे कलम ७, ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास अन्वर मुजावर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner